Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक ३३ ] गुरुवार ते बुधवार, नोव्हेंबर १०-१६, २०२२/कार्तिक १९-२५, शके १९४४ [पृष्ठे १६, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

(भाग चार- ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (ना.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. ११७.

### मुख्याधिकारी तथा नियोजन प्राधिकारी, नगर रचना, यांजकडून

### महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) अन्वये भंडारा शहराच्या प्रारुप विकास योजनेचे प्रसिद्धीकरण

### सूचना

क्रमांक न.प.भं.-का.वि.-न.र.-कार्या-२-विकास योजना-३५११-बी-२०२२.—

ज्याअर्थी, भंडारा नगरपरिषदेने (यापुढे " उक्त नियोजन प्राधिकरण " असे निर्देशिलेले), तिच्या अधिपत्याखालील क्षेत्राची (यापुढे " उक्त क्षेत्र " असे उल्लेखलेली), महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे " उक्त अधिनियम " असे निर्देशिलेली), चे कलम २१ (२) चे अनुषंगाने कलम ३८ मधील तरतुदीनुसार प्रारूप विकास योजना, भंडारा (यापुढे " उक्त प्रारूप विकास योजना " असे उल्लेखलेली), तयार करण्याचा इरादा ठराव क्र. ०१, दिनांक ३१ मे २०२१ अन्वये जाहीर करून त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, नागपूर विभाग पुरवणी भाग-१-अ मध्ये दिनांक १० जून २०२१ रोजी प्रसिद्ध केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २४ च्या तरतुदीस अनुसरून भंडारा नगरपरिषदेने उक्त क्षेत्रासाठी उक्त प्रारूप विकास योजना तयार करण्यासाठी सहायक संचालक, नगर रचना, भंडारा, शाखा, भंडारा यांची " नगर रचना अधिकारी " म्हणून आदेश क्र. १९८९, दिनांक १८ जून २०२१ अन्वये नेमणूक केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार, नगर रचना अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना भंडारा, शाखा, भंडारा यांनी, उक्त अधिनियमाचे कलम २५ अन्वये विद्यमान जमीन वापर नकाशा तयार केल्यानंतर, उक्त क्षेत्राची उक्त प्रारूप विकास योजना तयार करून ती उक्त नियोजन प्राधिकरणाकडे उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये प्रसिद्ध करण्यासाठी हस्तांतरीत केली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये उक्त प्रारूप विकास योजना जनतेकडून सूचना/हरकती मागविण्याकरिता प्रसिद्ध करण्यासाठी ठराव क्र. १३४, दिनांक ४ ऑक्टोबर २०२२ पारित केलेला आहे.

त्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरण उक्त प्रारूप विकास योजना, विकास योजना अहवालासह उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये नागरिकांकडून सूचना/हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध करीत आहे. सदरहू योजनेसंबंधीचे नकाशे व अहवाल कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ, खाली नमूद केलेल्या कार्यालयात उपलब्ध आहेत.

१. मुख्याधिकारी, भंडारा नगर परिषद, भंडारा.

२. सहायक संचालक, नगर रचना, भंडारा शाखा, भंडारा.

उक्त प्रारूप योजनेतील तरतुदीसंबधी नागरिकांच्या काही सूचना/हरकती असतील तर त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत मुख्याधिकारी, भंडारा नगरपरिषद यांचेकडे लेखी स्वरूपात कारणांसह पाठवाव्यात. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत नगर परिषदेकडे प्राप्त झालेल्या सूचना/हरकती विचारात घेतल्या जातील.

उक्त प्रारूप विकास योजनेचे नकाशे व तपशीलाच्या प्रती योग्य शुल्क आकारून भंडारा नगर परिषदेच्या कार्यालयात नागरिकांना उपलब्ध होऊ शकतील.

भंडारा :
दिनांक ४ ऑक्टोबर २०२२.

**विनोद जाधव,**
मुख्याधिकारी तथा
नियोजन प्राधिकारी,
नगर परिषद, भंडारा.

---

भाग १-अ (ना.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. ११८.

CHIEF OFFICER OR PLANNING AUTHORITY, MUNICIPAL COUNCIL

**PUBLICATION OF DRAFT DEVELOPMENT PLAN OF BHANDARA UNDER SECTION 26 (*1*) OF MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.**

*NOTICE*

No.MCB-Kavi-TP-Desk-2-DP-3511-A-2022.—

Whereas, the Bhandara Municipal Council, (hereinafter referred to as “the said Planning Authority,”) *vide* Resolution No.01, Dated 31 May 2021 had declared its intention to prepare a Draft Development Plan of Bhandara (hereinafter referred to as the “said Draft Development Plan”) for the area under its jurisdiction, (hereinafter referred to as the said “area”) as per the provision of Section 23(*1*) read with Section 38 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as the “said Act”) and notice to that effect is published in Maharashtra *Government Gazette,* Nagpur, Division, Supplement Part-1-A on 10th June 2021.

And whereas, as per the provision in Section 24 of the said Act, the Municipal Council *vide* Order No. 1989, dated 18th June 2021 has appointed Assistant Director, Town Planning, Bhandara Branch as "Town Planning Officer" to prepare the said Draft Development Plan for the said area;

And whereas, the Town Planning Officer and Assistant Director, Town Planning, Bhandara, Branch after having prepared Existing Land Use Map as per Section 25 of the said Act, has prepared the said Draft Development Plan of the said area and has handed it over to the said Planning Authority on date 4th October 2022 for publication under Section 26(*1*) of the said Act;

And whereas, the said Planning Authority has passed Resolution No. 134, dated 4th October 2022 to publish the said Draft Development Plan under Section 26(*1*) of the said Act, for inviting suggestions/ objections from the public;

Therefore, Bhandara Municipal Council hereby publishes the said Draft Development Plan along with the Report under Section 26(*1*) of the said Act for inviting suggestions/objections from the public. The copy of the said Draft Development Plan and Report thereof are kept open for inspection of the public at the following offices on all working days during office hours.

1. The Chief Officer, Bhandara Municipal Council.

2. Assistant Director, Town Planning, Bhandara Branch.

The suggestions/objections if any, in writing from the public in this regard with reasons, shall be submitted to the Chief officer, Bhandara Municipal Council, within the period of 30 days from the date of publication of the Notice in *Maharashtra Government Gazette.* Suggestions/objections received by the Municipal Council within the period of the 30 days from the date of publication of this Notice in *Maharashtra Government Gazette* shall only be considered.

The copies of the said Draft Development Plan and particulars shall be available to the public at reason-able price in the office of the Bhandara Municipal Council.

Bhandara :
Dated the 4th October 2022.

VINOD JADHAV,
Chief Officer or
Planning Authority,
Municipal Council, Bhandara.

**पुढील अधिसूचना असाधारण राजपत्र म्हणून त्यांच्यापुढे दर्शविलेल्या दिनांकांना प्रसिद्ध झालेल्या आहेत.**

**१४**

**गुरुवार, मार्च २४, २०२२/चैत्र ३, शके १९४४**

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १६२.

## जिल्हाधिकारी, यांजकडून

**आदेश**

क्रमांक कार्या-१०-नपाप्र-म.स.-न.प. सार्व.- निवडणूक २०२१-२०२२-कावि-३०७-२०२१-२०२२.—

महाराष्ट्र नगर परिषदा आणि नगरपंचायती (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम, २०१० चे नियम ६ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, संजय मीणा, भा.प्र.से., जिल्हाधिकारी, गडचिरोली या प्रगटनाद्वारे असे जाहीर करतो की, गडचिरोली जिल्ह्यातील नगरपंचायत अहेरी, सिरोंचा व एटापल्ली या नगरपंचायतीमध्ये पार पडलेल्या विशेष सभेत खालील अनुसूचीतील रकाना क्रमांक (२) मध्ये नमूद केलेली व्यक्तींची रकाना (३) मध्ये नमूद नगरपंचायतीमध्ये स्विकृत सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.

**अनुसूची**

| अ. क्र. | स्विकृत सदस्यांचे नाव | नगरपंचायतीचे नाव |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | गोडशेलवार प्रशांत विलास | नगरपंचायत, अहेरी |
| २ | बंदेला राजेश कोंडय्या | नगरपंचायत, सिरोंचा |
| ३ | गागापुरवार नागेश्वर गोविंदम | |
| ४ | बोरकर मनोहर भगवान | नगरपंचायत, एटापल्ली |

गडचिरोली :
दिनांक २३ मार्च २०२२.

**संजय मीणा** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, गडचिरोली.

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १६३.

BY COLLECTOR

*ORDER*

No. Desk-X-M.C.A.-R.A.,/NP General Election-2021-22-W.N.-307-2022.—

In exercise of the powers conferred upon me by Rule 6 of the Maharashtra Municipal Councils and *Nagar Panchayat* (Qualifications and Procedure for Appointment of Nominated Councillor) Rules, 2010, I, Sanjay Meena, IAS, the Collector, Gadchiroli do hereby publish the declared to in the special meeting held in Nagar Panchayat Aheri, Sironcha, Etapalli Nagar Panchayats in Gadchiroli District, the persons mentioned in the following Schedule Column No. (*2*) have been nominated in the Nagar Panchayat mentioned in column (*3*).

SCHEDULE

| Sr. No. | Name of the Nominated Councillors | Name of the Municipal Council |
|---|---|---|
| (1) | (2) | (3) |
| 1 | Godshelwar Prashant Vilas | Nagar Panchayat, Aheri. |
| 2 | Bandela Rajesh Kondayya | Nagar Panchayat, Sironcha. |
| 3 | Gagapurwar Nageshwar Govindam | |
| 4 | Borkar Manohar Bhagwan | Nagar Panchayat, Etapalli. |

Gadchiroli :
Dated the 23rd March 2022.

SANJAY MEENA (I.A.S.),
Collector, Gadchiroli.

१५

## शुक्रवार, एप्रिल ८, २०२२/चैत्र १८, शके १९४४

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १६४.

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ एप्रिल २०२२.

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

**अधिसूचना**

क्रमांक टिपीएस.-२४२१-६२५-प्र.क्र. ६५-२०२१-नवि-९.—

ज्याअर्थी, नागपूर शहराची सुधारित विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे " उक्त अधिनियम " असे संबोधले आहे.) चे कलम ३१ (१) अन्वये शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र. टिपीएस-२४९६-२६४३-प्र.क्र. ३००(अ)-९७-नवि-९, दिनांक ७ जानेवारी २००० अन्वये भागशः मंजूर व क्र. टिपीएस-२४००-१६२८-प्र.क्र. २००-२०००-नवि-९, दिनांक १० सप्टेंबर, २००१ नुसार अंतिमतः मंजूर करण्यात आलेली असून ती अनुक्रमे दि. १ मार्च २००० व दिनांक २१ सप्टेंबर २००१ पासून अंमलात आली आहे (यापुढे " उक्त विकास योजना " असे संबोधले आहे.);

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत, मौजे दाभा मधील खसरा क्र. २८/१ क्षेत्र १.२६ हेक्टर ही जागा कृषि विभागात समाविष्ट आहे (यापुढे ज्यास " उक्त जागा " असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर नियोजन प्राधिकरण (यापुढे " उक्त नियोजन प्राधिकरण " असे संबोधिले आहे) म्हणून त्यांच्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ११८०, दिनांक १३-०६-२०१८ नुसार उक्त जागा कृषी विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्याचे ठरवून, त्याअनुषंगाने, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उप कलम (१) मध्ये नमूद वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन फेरबदल प्रस्तावास मंजुरीसाठी शासनास सादर केलेला आहे (यापुढे " प्रस्तावित फेरबदल " असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी, आवश्यक त्या चौकशी नंतर व संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर उक्त फेरबदल काही अटींसह मान्य करावा, असे राज्य शासनाचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, खसरा क्र. २८/१ क्षेत्र १.२६ हेक्टर या जमिनीच्या मालकानी सन २०२१-२२ या वर्षातील बाजारमूल्यदर तक्त्यानुसार येणा-या रक्कमेच्या ५% दराने योणा-या अधिमूल्य रक्कमेपैकी ५०% शासनास देय असलेली अधिमूल्याची रक्कम रुपये १६,६९,५०० सहायक संचालक, नगर रचना, नागपूर शाखा, नागपूर यांचेकडील लेखाशिर्षामध्ये दिनांक ११-०२-२०२२ रोजी जमा केलेली आहे. आणि नियोजन प्राधिकरणास देय असलेली ५०% अधिमूल्याची रक्कम रुपये १६,६९,५०० सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांचेकडे दिनांक १२-०१-२०२२ अन्वये जमा केलेली आहे.

आता, त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उप कलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने असलेल्या इतर अधिकारांचा वापर करुन उक्त विकास योजनेतील प्रस्तावित फेरबदलास शासन पुढील प्रमाणे मान्यता देत आहे आणि त्यासाठी उपरोल्लिखित दिनांक ७ जानेवारी २००० ची विकास योजना मंजुरीची अधिसूचना सुधारित करण्यात येत आहे.

" उक्त विकास योजना मंजुरीच्या दिनांक ७ जानेवारी २००० च्या अधिसूचनेच्या फेरबदल सुचितील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे."

मौजे दाभा येथील खसरा क्र. २८/१ क्षेत्र १.२६ हेक्टर आर जागा खालील अटींच्या अधिन राहून, कृषी विभागातून वगळण्यात येत आहे. व मुक्त झालेली जागा नकाशात दर्शविल्यानुसार, रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.

**नोंद**

**अट क्र. १ :–** नागपूर शहराच्या प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीनुसार, जागेच्या रेखांकनात आवश्यक खुल्या जागेव्यतिरिक्त, १०% सुविधा क्षेत्र सोडणे बंधनकारक राहील.

**अट क्र. २ :–** खुल्या जागेसभोवताल कुंपणभिंत करणे आवश्यक राहील.

**अट क्र. ३ :–** उक्त जमिनीसाठी आवश्यक त्या सर्व मुलभूत सेवा-सुविधा जमीन मालकांनी/विकसनकर्त्यांनी स्वखर्चाने विकसीत करुन पुरविणे बंधनकारक राहील. मूलभूत सुविधांमध्ये रस्ते, पाणी पुरवठा, मलनिःसारण व ड्रेनेज इ. यांचा समावेश आहे.

**अट क्र. ४ :–** उपरोक्त मुलभूत सुविधांचा विकास क्रमाने करताना एकूण अपेक्षित सुविधांचा विकास टप्प्याने होत असताना अर्जदारावर, एकूण जागेच्या भूखंड विक्रीवर खालीलप्रमाणे बंधन राहील. सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांनी सदर बाबींवर नियंत्रण ठेवावे.—

| | | | |
|---|---|---|---|
| (क) | अभिन्यास अंतिमतः मंजूर झाल्यानंतर | . . | एकूण भूखंडांपैकी २५% भूखंडांची विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ख) | सुमारे ४०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | . . | एकूण भूखंडांपैकी ५०% भूखंडांची विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ग) | सुमारे ६०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | . . | एकूण भूखंडांपैकी ७५% भूखंडांची विक्री अनुज्ञेय राहील. |
| (घ) | सुमारे ८०% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | . . | एकूण भूखंडांपैकी ९०% भूखंडांची विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ङ) | सुमारे १००% मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | . . | एकूण १००% भूखंड विक्री अनुज्ञेय राहील. |

उपरोक्त मंजुर फेरबदल दर्शविणा-या विकास योजना भाग नकाशाची प्रत, सभापती, नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर यांच्या कार्यालयांत कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी उपलब्ध राहील.

सदर अधिसूचना विभागाच्या **www.maharashtra gov.in** या संकेतस्थळावर देखील उपलब्ध राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**देवदत्त रहाणे,**
कार्यासन अधिकारी.

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १६५.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, Date 7th April 2022.

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

*NOTIFICATION*

No. TPS-2421-625-C.R.65-2021-UD-9.----

Whereas, Revised Development Plan of Nagpur City has been sanctioned by the Government *vide* Urban Development Department's Notification No. TPS-2496-2643-CR-300(A)-97-UD-9, dated the 7th January 2000 and finally sanctioned the Government *vide* Notification No. TPS-2400-1628-CR-200-2000-UD-9, dated the 10th September, 2001 and has come into force with effect from the 1st March 2000 and 21st September 2001 (hereinafter referred to as "the said Development Plan") under Sction 31 (1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act");

And whereas, in the said Development Plan, land bearing Khasara No. 28/1 area 1.26 Hector of Mouje Dabha (hereinafter referred to as "the said Land"), is included in Agricultural Zone;

And whereas, the Nagpur Improvement Trust, Nagpur (hereinafter referred to as "the said Planning Authority"), *vide* its General Body Resolution No. 1180, dated the 13-06-2018 has resolved to delete the said Land from Agricultural Zone and to include the same in Residential Zone and accordingly submitted to the Government for its sanction, a modification proposal as per the provisions of sub section (*1*) of Section 37 of the said Act, (hereinafter referred to as "the Proposed Modification");

And whereas,after making necessary enquiries and consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune , the Government is of the opinion that the proposed Modification should be sanctioned with some conditions

And whereas, the Land Owners of the said lands have deposited Rs. 16,69,500 towards the 50% Government share of 5% premium amount as per the value of the said lands as prescribed in the Annual Statement of Rates (ASR) for the year 2021-22 in the Government Treasury on 11-02-2022 through the Assistant Director of Town Planning, Nagpur Branch, Nagpur and remaining 50% of the 5% premium amount Rs. 16,69, 500 payable to the Planning Authority has been deposited with the Chairman, Nagpur Improvement Trust, Nagpur on 12-01-2022;

Now therefore, in exercise of the powers conferred on it under sub, section *(2)* of Section 37 of the said Act, the Governent hereby, sanctions the Proposed Modification and for that purpose amends the aforesaid Notification dated the 07th January 2000 as follows;

"in the Schedule of Modifications appended to the Notification dated 7th January 2000 sanctioning the said Development Plan the following new entry shall be added after the last entry".

*ENTRY*

" The land bearing Khasara No. 28/1 area 1.26 Hector of Mouje Dabha is deleted from Agriculture Zone and land thus released, is included in Residential Zone as shown on the plan, subject to the conditions mentioned specified below :–

*Condition No. 1 :* In the layout of the said Land, 10% Amenity Space shall be provided in addition to compulsory open space, as per the prevailing Development Control Regulations for Nagpur.

*Condition No. 2 :* It is necessary to construct compound wall around the open space.

*Condition No. 3 :* It is compulsory for the land owner/developer, to provide all the Basic Amenities required for the land under modification at his own cost. The basic amenities included as road, water supply, sewerage and drainage *etc.*

*Condition No. 4 :* If the land is proposed to be developed by way of plotted layout, then sale of plots under such layout shall be monitored by the Chairman, Nagpur Improvement Trust, Nagpur in relation to development of basic amenities as per the stages given below.—.

| | | |
|---|---|---|
| (a) | After final approval of layout | Sale of 25% of the total Plots shall be permissible. |
| (b) | After completion of 40% basic amenities | Sale of 50% of the total Plots shall be permissible. |
| (c) | After completion of 60% of basic amenities | Sale of 75% of the total Plots shall be permissible. |
| (d) | After completion of 80% of basic amenities | Sale of 90% of the total Plots shall be permissible. |
| (e) | After completion of 100% of basic amenities | Sale of 100% of the total Plots shall be permissible. |

A copy of the Notification along with the part plan showing the aforesaid sanctioned modification, shall be available for inspection of the general public, in the office of the Chairman, Nagpur Improvement Trust, Nagpur during office hours on all working days for a period of one month.

This Notification shall also be available on the Urban Development Department's web site-*www.maharashtra,gov.in*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DEODATTA RAHANE,
Section Officer.

१६

## बुधवार, एप्रिल २०, २०२२/चैत्र ३०, शके १९४४

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १६६.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक म.स.-जिपपंसनि-कावि-१४३-२०२२.—

ज्याअर्थी, शासन अधिसूचना ग्राम विकास विभाग यांचे आदेश क्र. पंसनि-२०१८-प्र.क्र. (२)-२१८-पंरा (२), दिनांक २७ नोव्हेंबर २०१९ तसेच ग्राम विकास विभाग यांचे प्र. क्र. जिपनि-२०२२-प्र. क्र. ३१-अ-परा-२, दिनांक १२ एप्रिल २०२२ व महाराष्ट्र जिल्हा परिषद (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती) व पंचायत समित्या (सभापती व उपसभापती) पदाचे आरक्षण व निवडणूक नियम, १९६२ च्या नियम २-ई व एफ च्या तरतुदीनुसार, गोंदिया जिल्ह्यातील आठही पंचायत समित्यांकरिता पुढील अडीच वर्षाच्या कालावधीकरिता, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व महिला यांचे करीता राखून ठेवायच्या सभापती पदांची संख्या विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

त्याअर्थी, मी, नयना गुंडे, जिल्हाधिकारी, गोंदिया जिल्ह्यातील आठही पंचायत समितीमध्ये पुढील अडीच वर्षाचे कालावधीकरीता सभापती पदांचे आरक्षण दिनांक १९ एप्रिल २०२२ रोजी काढलेल्या सोडतीमध्ये झालेल्या निर्णयाप्रमाणे आरक्षित झाल्याचे जाहीर करीत आहे.

**अनुसूची**

| अ. क्र. | पंचायत समितीचे नाव | ज्या प्रवर्गासाठी सभापती पद आरक्षित झाले तो प्रवर्ग |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | आमगांव | सर्वसाधारण |
| २ | सालेकसा | अनुसूचित जाती |
| ३ | देवरी | सर्वसाधारण (महिला) |
| ४ | सडक अर्जुनी | सर्वसाधारण (महिला) |
| ५ | गोंदिया | सर्वसाधारण |
| ६ | तिरोडा | सर्वसाधारण (महिला) |
| ७ | गोरेगाव | सर्वसाधारण |
| ८ | अर्जुनी मोरगांव | अनुसूचित जमाती (महिला) |

गोंदिया :
दिनांक १९ एप्रिल २०२२.

**नयना गुंडे,**
जिल्हाधिकारी, गोंदिया.

१७

## सोमवार, एप्रिल २५, २०२२/वैशाख ५, शके १९४४

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १६७.

**नगर विकास विभाग**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ०१ एप्रिल, २०२२.

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.—**

**अधिसूचना**

क्रमांक टिपीएस-२४२१-९३४ व १०६५-प्र.क्र.९१-नवि-९-२०२१.—

ज्याअर्थी, नागपूर शहराची सुधारीत विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधले आहे.) चे कलम ३१ (१) अन्वये शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्रमांक टिपीएस-२४९६-२६४३-प्र.क्र.३००(अ)-९७-नवि-९, दि. ०७ जानेवारी २००० अन्वये भागशः मंजूर व क्र. टिपीएस-२४००-१६२८-प्र.क्र. २००-२०००-नवि-९, दि. १० सप्टेंबर २००१ नुसार अंतिमतः मंजूर करण्यात आलेली असून ती अनुक्रमे दि. १ मार्च २००० व दिनांक २१ सप्टेंबर, २००१ पासून अंमलात आलेली आहे . (यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधले आहे.) ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये, मौजा भांडेवाडी येथील खसरा क्र. ६, ७, ८(भाग), ९ (भाग), १० (भाग), ११/२, ११/३, १२, १३ आणि ८० (भाग), व मौजा पारडी येथील खसरा क्रमांक ६९/१, ६९/२, आणि ८१/१ या जागा (यापुढे "उक्त जागा " असे संबोधले आहे.) आरक्षण क्र. ई-३४ प्राथमिक शाळा, आरक्षण क्र. ई-३३ मार्केट, आरक्षण क्र. एमई-४० पार्क व १८.०० मीटर (पूर्व-पश्चिम ) विकास योजना रस्त्यामध्ये समाविष्ट आहे (यापुढे "उक्त आरक्षणे " असे संबोधले आहे.)

आणि ज्याअर्थी, नागपूर महानगरपालिका, नागपूर नियोजन प्राधिकरण (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे संबोधले आहे.) म्हणून, त्यांच्या ठराव क्र. ३५, दि. २० जानेवारी २०२१ नुसार उक्त आारक्षणाच्या संरचनेत बदल करून तसेच आरक्षणाच्या क्षेत्रात व पुनर्रचनेमुळे आकारमानामध्ये व नामाभिदान मध्ये बदल करून त्यामध्ये आरक्षण क्र. ई -३३ मार्केट, पार्किंग, ग्रेव्ह यार्ड, वाहनतळ आरक्षण क्र. ई ३४ मटण व फिश मार्केट , आरक्षण क्र. एमई-४० व्हेजिटेबल मार्केट, रहिवास, भंडारा रोड पासुन दक्षिणेस १२.० मी. रुंद रस्ता आणि पूर्वेस १८.० मी. रुद विकास योजना रस्त्यापर्यंत १२.० मी. रुंद रस्ता प्रस्तावित करण्याचे ठरवून, त्या अनुषंगाने, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उप-कलम (१) मध्ये नमूद वैधानिक कार्यवाही पूर्ण करून फेरबदल प्रस्तावास मंजुरीसाठी शासनास सादर केलेला आहे (यापुढे " उक्त प्रस्तावित फेरबदल" असे संबोधले आहे.) ;

आणि ज्याअर्थी, आवश्यक त्या चौकशीनंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी सल्ला घेतल्यानंतर उक्त फेरबदल काही अटीसह मान्य करावा, असे राज्य शासनाचे मत झाले आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रस्तावित फेरबदलामधील काही जमिनी खाजगी मालकीच्या असून या जमिनी रहिवास विभागात समाविष्ट होणार असल्याने या जमीन मालकांकडून शासनाच्या दिनांक २० एप्रिल २०१६ रोजीच्या धोरणानुसार बाजारमूल्य दर तक्त्यानुसार उक्त वापराखालील जमीन दराच्या ५% दराने येणा-या अधिमूल्य रक्कमेचा भरणा झाल्यानंतर संबंधित क्षेत्रासाठी अधिसूचना निर्गमित करण्यात येईल ;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम ३७ चे उप-कलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने असलेल्या इतर अधिकारांचा वापर करून उक्त विकास योजनेतील प्रस्तावित फेरबदलास शासन पुढीलप्रमाणे मान्यता देत आहे आणि त्यासाठी उपरोल्लिखित दिनांक ७ जानेवारी, २००० ची विकास योजना मंजुरीची अधिसूचना सुधारीत करण्यात येत आहे ;

"उक्त विकास योजना मंजुरीच्या दिनांक ७ जानेवारी २००० च्या अधिसूचनेच्या फेरबदल सूचितील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा करण्यात येत आहे " —

**नोंद**

नागपूर शहराच्या मंजूर विकास योजनेमधील मौजा- पारडी व भांडेवाडी येथील आरक्षण क्र. ई -३३ मार्केट, आरक्षण क्र. ई -३४ प्राथमिक शाळा आणि आरक्षण क्र. एमई -४० पार्क, या आरक्षणाच्या संरचनेत तसेच क्षेत्रात व पुनर्रचनेमुळे आकारमानात व नामभिदानात बदल करून खालील प्रमाणे नकाशामध्ये दर्शविल्यानुसार फेरबदल प्रस्ताव अटीस अधिन राहून मंजूर करण्यथ्सात येत आहे.—

**अनुसूची**

| अ. क्र. | फेरबदल प्रस्ताव | क्षेत्र | मौजा | खसरा क्रमांक | समुचित प्राधिकरण |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३)<br>हे. आर | (४) | (५) | (६) |
| १ | आरक्षण क्रमांक ई-३३ मार्केट | ०.६५२ | भांडेवाडी | ११/१-३(पै.),<br>१२/(पै.), १३(पै.), | नागपूर महानगरपालिका |
| २ | पार्किंग | ०.३६५६ | भांडेवाडी | १३(पै.) | नागपूर महानगरपालिका |
| ३ | ग्रेव्ह यार्ड (दफनभूमी) | ०.९७ | भांडेवाडी | १३(पै.) | नागपूर महानगरपालिका |
| ४ | भंडारा रोड पासून कडून दक्षिणेस<br>१२.० मी. रुंद विकास योजना रस्ता | ०.१५४ | भांडेवाडी<br>पारडी | ११/१-३(पै.), | नागपूर महानगरपालिका |
| ५ | आरक्षण क्र. ई -४० व्हेजिटेबल मार्केट | ०.९० | भांडेवाडी | ११/१-३(पै.),<br>१३(पै.),६(पै.),७(पै.),<br>८१(पै.), | नागपूर महानगरपालिका |
| ६ | १२.० मी. रूंद विकास योजना रस्ता | ०.१९९२ | भांडेवाडी | ११/१-३(पै.),<br>१२(पै.),१३(पै.). | नागपूर महानगरपालिका |
| ७ | आरक्षण क्र. ई -३४ मटण व फिश मार्केट | ०.६३४ | भांडेवाडी | ६(पै.), ७(पै.), | नागपूर महानगरपालिका |
| ८ | मार्केट व पार्किंग | ०.८९ | पारडी | ६९ (पै.), | नागपूर महानगरपालिका |

**अट क्रमांक १.** विषयांकित फेरबदल प्रस्तावाखाली काही जमिनी शासकीय असून जागेचा विकास करण्यापूर्वी जिल्हाधिकारी, नागपूर यांचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक आहे.

**अट क्रमांक २.** सदर जागेबाबत किंवा जागेमधील आरक्षणांचे संदर्भात काही न्यायालयीन प्रकरणे असल्यास मा. न्यायालयाचे निर्णयांचे पालन करणे आवश्यक राहील.

उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारी प्रस्तुत अधिसूचना / भाग नकाशा आयुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचे कार्यालयात, नागरीकांच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या कालावधीसाठी ठेवण्यात येत आहे .

सदर अधिसूचना शासनाच्या **www.maharashtra.gov. in** या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**देवदत्त रहाणे,**
कार्यासन अधिकारी.

भाग १-अ (असा.)(ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १६८.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, Mumbai-400 032, Dated the 01st April, 2022.

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.—

*NOTIFICATION*

No. TPS-2421-934 & 1065-CR-91-UD-9-2021.—

Whereas, Revised Development Plan of Nagpur City has been sanctioned by the Government *vide* Urban Development Department's Notification No. TPS-2496/2643-CR-300(A)-97-UD-9, dated 7th January, 2000 and finally sanctioned th Government *vide* Notification No. TPS-2400/1628-CR-200-2000-UD-9, dated the 10th September, 2001 & has come into force with effect from 1st March, 2000 & 21st September, 2001 (hereinafter referred to as "the said Development Plan") under Section 31(*1*) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") ;

And whereas, in the said Development Plan, land bearing Khasara Nos. 6, 7, 8(pt.), 9(pt.), 10(pt.), 11/2, 11/3, 12, 13 & 80(pt.) of Mouje Bhandewadi and Khasara No. 69/1, 69/2 & 81/1 of Mouje Pardi (hereinafter referred to as "the said Lands") are reserved for Site No.E-34 Primary School, Site No.E-33 Market, Site No.ME-40 Park and 18.00 Mt. (East--West) D.P. Road (hereinafter referred to as "the said reservations") ;

And whereas, the Nagpur Municipal Corporation, Nagpur being the Planning Authority (hereinafter referred to as "the said Planning Authority"), *vide* its Resolution No. 35, dated 20th Juanuary 2021 has resolved to making modification in reservation boundary, change in nomenclature, for the said reservation and proposed to Site No.E-33 Market, Parking, Grave-Yard, Site No.E-34 Mutton & Fish Market, Site No.ME-40 Vegetable Market, Residential, 12.00mt. D.P. Road towards Southern from Bhandara road & 12.00mt. D.P. Road upto 18.00mt. D.P. Road on Eastern side. Accordingly after following all the legal procedure as per the provisions of sub-section (*1*) of Section 37 of the said Act submitted to the Government for it's sanction, modification proposal (hereinafter referred to as "the said Modification Proposal") ;

And whereas, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune the Government is of opinion that the said Modification proposal should be sanctioned with some Conditions ;

And whereas, the some of the land/s out of the said modification proposal are Private and such land/s are proposed to be included in Residential Zone. The Notificaiton in respect of such Private land/s will be issued after payment of 5% premium calculated as per rate of land prescribed in ASR, as per government policy dated 20 April 2016, by the land owner ;

Now, therefore, in exercise of the powers conferred on it under sub-section (*2*) of Section 37 of the said Act, the Government hereby, sanctions the said Proposed Modification and for that purpose amends the aforesaid Notification dated the 07 January 2000 as follows.—

ना.-एक-अ-४ (१७३७).

In the Schedule of Modifications appended to the Notification dated 7th January 2000 sanctioning the said Development Plan, the following new entry shall be added after the last entry–

*ENTRY*

The boundaries of Site No. E-33 Market, Site No. E-34 Primary School and Site No. ME-40 Park of the Revised Development Plan of Nagpur City, are modidfied & Change in nomenclature & Sanctioned as mentioned below as shown on the plan subject to the following Condition.

*SCHEDULE*

| Sr. | Modification Proposal | Area A.H. | Village | Khasara No | Appropriate Authority |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) |
| 1 | Site No. E-33 Market | 0.652 | Bhandewadi | 11/1-3(Pt.), 12(Pt.),13((Pt.), | Nagpur Municipal Corporation |
| 2 | Parking | 0.3656 | Bhandewadi | 13(Pt.), | Nagpur Municipal Corporation |
| 3 | Grave-Yard | 0.97 | Bhandewadi | 13(Pt.), | Nagpur Municipal Corporation |
| 4 | Bhandara Road to South side 12.0 mt. D.P. Road | 0.154 | Bhandewadi | 11/1-3(Pt.), | Nagpur Municipal Corporation |
| 5 | Site No. ME-40 Vegetable Market | 0.90 | Bhandewadi | 11/1-3(Pt.), 13(Pt.), 6((Pt.), 7((Pt.), 81((Pt.), | Nagpur Municipal Corporation |
| 6 | 12.0 ¨mt. DP Road | 0.1992 | Bhandewadi Pardi | 11/1-3(Pt.), 12(Pt.), 13((Pt.), | Nagpur Municipal Corporation |
| 7 | Site No. E-34 Mutton & Fish Market | 0.634 | Bhandewadi | 6(Pt.), 7((Pt.) | Nagpur Municipal Corporation |
| 8 | Market & Parking | 0.89 | Pardi | 69(Pt.) | Nagpur Municipal Corporation |

**Condition No. 1.** No Objection Certificate from Collector Nagpur shall be obtained before the development of the Government land under the said modification proposal.

**Condition No. 2.** In case there are Court Cases in respect of the said land or reservations on the said land, the order of the Hon’ble Court shall be strictly complied.

A copy of the Notification, along with the part plan showing the aforesaid sactioned modification, shall be available for inspection of the general public, in the Office of the Commissioner, Nagpur Municipal Corporation, Nagpur during office hours on all working days for a period of one month.

This Notification shall also be available on the Government web site *www.maharashtra.gov. in*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DEODATTA RAHANE,
Section Officer.

१८

**मंगळवार, एप्रिल २६, २०२२/वैशाख ६, शके १९४४**

भाग १-अ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. १६९.

## जिल्हाधिकारी, यांजकडून

### अधिसूचना

क्रमांक सं.क्र.-जिकाभं-अका-जिपपंसनि-२०२१-कावि-१११-२०२२.—

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मुंबई यांचेकडील महाराष्ट्र शासन राजपत्र अधिसूचना असाधारण क्र. ४१७ क्रमांक जिपनि, २०१८-प्र.क्र.२१८(२)-पंरा-२, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१९ अन्वये महाराष्ट्र जिल्हा परिषदा (अध्यक्ष, उपाध्यक्ष व विषय समित्यांचे सभापती आणि पंचायत समित्या (सभापती व उपसभापती) (पदांचे आरक्षण व निवडणूक) नियम, १९६२ च्या नियम २ ई च्या तरतुदीनुसार अडीच वर्षाच्या कालावधीसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग आणि महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिलासह) राज्यातील पंचायत समित्यांच्या सभापतीच्या राखून ठेवावयाच्या पदांची संख्या विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मुंबई यांचेकडील महाराष्ट्र शासन राजपत्र अधिसूचना असाधारण क्र. ४१७ क्रमांक जिपनि, २०१८-प्र.क्र.२१८(२)-पंरा-२, दिनांक २७ नोव्हेंबर, २०१९ अन्वये अडीच वर्षाच्या कालावधीसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग आणि महिला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिलासह) उक्त नियमातील २ फ यातील तरतुदीनुसार पंचायत समित्यांच्या सभापतीच्या पदाचे अनुसूचितील अनुक्रमांक ३० नुसार भंडारा जिल्ह्याकरीता सभापती पदांची संख्या विनिर्दिष्ट करून वाटप केले आहे.

तसेच ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मुंबई यांचेकडील पत्र क्रमांक जिपनि, २०२२-प्र.क्र.३१ अ-पंरा-२, दिनांक १२ एप्रिल, २०२२ नुसार मा. सर्वोच्च न्यायालयातील रिट याचिका क्र. ९८०/२०१९, विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०21 व रिट याचिका क्र. ८४१/२०२१ यांमधील आदेश लक्षात घेता नागरिकांच्या मागास प्रवर्गातील पंचायत समिती सभापती, सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांच्या मृत्यू अथवा राजीनामा यामुळे रिक्त झालेली पदे तसेच आगामी काळातील उपरोक्त नमूद पदांच्या प्रस्तावित निवडणुका या सर्वसाधारण प्रवर्गामधून भरण्याबाबतचे निर्देशित केले आहे.

त्याअर्थी, मी, संदीप कदम, जिल्हाधिकारी, भंडारा उक्त नियमातील नियम २ फ च्या पोट-नियम (२) ते (५) च्या तरतुदीनुसार जिल्ह्यातील ७ पंचायत समित्यांमध्ये अडीच वर्षाच्या कालावधीसाठी सभापतीच्या आरक्षित पदांचे आरक्षण दिनांक २२-०४-२०२२ रोजी काढण्यात आलेल्या पंचायत समिती सभापती पदाच्या आरक्षण सोडतीमध्ये झालेल्या निर्णयाप्रमाणे आरक्षित झाल्याचे याद्वारे खाली नमूदप्रमाणे जाहीर करण्यात येत आहे.

**अनुसूची**

| अ. क्र. | पंचायत समिती | सभापती पदासाठी आरक्षित पदाचा प्रवर्ग |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | तुमसर | सर्वसाधारण |
| २ | मोहाडी | अनुसूचित जाती |
| ३ | साकोली | सर्वसाधारण |
| ४ | लाखनी | सर्वसाधारण महिला |
| ५ | भंडारा | सर्वसाधारण महिला |
| ६ | पवनी | सर्वसाधारण महिला |
| ७ | लाखांदुर | अनुसूचित जमाती (महिला) |

भंडारा :
दिनांक २२ एप्रिल २०२२.

**संदीप कदम,**
जिल्हाधिकारी,
भंडारा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.